जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. लोकमत शुक्रवार, दिनांक 11 MAR 2016

देवानंद शिंदे : शासकीय तंत्रनिकेतनकडून ८३९ स्नातकांना पदविका प्रदान

# स्वत:ला सिद्ध करण्याची तयारी ठेवा



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. लोकमत शुक्रवार, दिनांक 11 MAR 2016

# चौन्नम विद्यापीठ, धातुतंत्र प्रबोधिनीशी करार

## शिवाजी विद्यापीठ : नवसंशोधनाची संधी, उद्योगांना बळ देणारे पाऊल

कोल्हापूर : दक्षिण कोरियातील चौन्नम राष्ट्रीय विद्यापीठ व कोल्हापुरातील धातुतंत्र प्रबोधिनीसमवेत सामंजस्य करार करून शिवाजी विद्यापीठाने गुरुवारी फौंड्री व अन्य उद्योगांतील नवसंशोधनाच्या दिशेने पाऊल टाकले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ-उद्योग समन्वय कक्ष आणि दक्षिण कोरियातील ग्वांगजू येथील नामांकित चौन्नम राष्ट्रीय विद्यापीठातील 'लिडर्स इन इंडस्ट्रीय-युनिव्हर्सिटी को-ऑपरेशन' या उपक्रमासाठी सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या सभागृहात करार झाला.

### फौंड्री उद्योग संशोधन

शासकीय तंत्रनिकेतनमध्ये शिवाजी विद्यापीठ आणि धातुतंत्र प्रबोधिनी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. करारावर नियामक मंडळाचे अध्यक्ष किरण पाटील व प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी डॉ. ए. एम. गुरव, समीर पारीख, एस. एम. मोडरे उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, करारामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील उद्योगांना दक्षिण कोरियातील सुमारे ६५० प्रमुख उद्योगांशी संवाद व सहकार्य संबंध प्रस्थापित करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.


कार्यक्रमात चौन्नम विद्यापीठातील लिंक प्रकल्पाचे प्रा. यौंग ह्यून जेऊंग, पदार्थ वैज्ञानिक प्रा. सेंग-वॅन रियू, बीसीयुडी संचालक डॉ. डी.आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, उद्योजक सचिन मेनन, रणजित शाह, सचिन शिरगांवकर, सोहम शिरगांवकर, योगेश कुलकर्णी, वैभव नाईक, यतिन जनवाडकर, प्रसाद गुळवणी, सुशील काळे, किरण पाटील, मनोज लक्ष्मेश्वर, गिरीश यड्डे, डॉ. सी. डी. लोखंडे, पी. एस. पाटील, ए. के. साहू, ए. एम. गुरव, एस. बी. सादळे, एम. एम. लेखक, एन. जी. देशपांडे उपस्थित होते. सामंजस्य करारावर प्रा. जेऊंग आणि प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. 'महाराष्ट्र टाइम्स' शुक्रवार दिनांक 11 MAR 2016

# कुशल मनुष्यबळाची गरज

## शासकीय तंत्रनिकेतनचा २१ वा पदविका प्रदान कार्यक्रम उत्साहात





जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. 'महाराष्ट्र टाइम्स' शुक्रवार दिनांक 11 MAR 2016

# चोइथराम विद्यापीठाशी एमओयू



संशोधनाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना संधी

धातुरंग प्रयोगशाळेशी करार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. 'महाराष्ट्र टाइम्स' शुक्रवार दिनांक 11 MAR 2016


# 'बाळासाहेब देसाई खरेखुरे लोकनेते'



दै. 'लोकमत' शुक्रवार दिनांक 11 MAR 2016

# बाळासाहेब देसाई खरेखुरे लोकनेते

## अरुण भोसले : शिवाजी विद्यापीठात अध्यासनतर्फे व्याख्यान



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. 'महाराष्ट्र टाइम्स'

शुक्रवार दिनांक 11 MAR 2016

## डॉ. आंबेडकरांच्या आज १२५ व्याख्याने

दै. 'सकाळ' शुक्रवार दिनांक 11 MAR 2016

# आंबेडकरांच्या विचारांचा आज जागर





कोल्हापूर : धातू तंत्र प्रबोधिनी आणि शिवाजी विद्यापीठात गुरुवारी झालेल्या सामंजस्य करारावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. आर. मोरे, महेश काकडे, प्रशांत पट्टलवार, किरण पाटील, डॉ. ए. के. उपाध्याय, पी. बी. कांबळे, ए. बी. पर्वते, विक्रमसिंग शिंदे आदी.

# विद्यापीठाचा धातू प्रबोधिनीसह दक्षिण कोरियाशी करार

» पान १ वरून

करार करण्यात आला. 'लिंक' हा दक्षिण कोरिया सरकारचा महत्त्वाचा उपक्रम असून त्याअंतर्गत चोन्नम विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय स्तरावर इतर देशांतील उद्योग-व्यवसायांशी बिझनेस टाय-अप्स, तंत्रज्ञान आदान-प्रदान, बिझनेस जॉईंट व्हेंचर तसेच संशोधन व विकास आदी स्तरांवर सहकार्य संबंध प्रस्थापित करणे अपेक्षित आहे. चोन्नम विद्यापीठाचा शिवाजी विद्यापीठाशी झालेला आजचा सामंजस्य करार हा प्रामुख्याने कोरियन उद्योग व भारतीय उद्योगांमधील सहकार्य वृद्धीशी निगडित आहे. भारतीय विद्यापीठाशी अशा प्रकारे होणारा हा देशातील पहिलाच सामंजस्य करार आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठाच्या शिष्टमंडळाने गेल्या महिन्यात दक्षिण कोरियास भेट दिली होती. त्या वेळी चोन्नम विद्यापीठातील 'लिंक' या अभिनव उपक्रमाची माहिती घेता आली. त्यामुळे असा प्रकल्प भारतात राबविता येईल का, याविषयी प्रकल्पप्रमुख प्रा. कीम यांच्याशी बोलणे झाले होते. त्यामुळे हा करार त्या भेटीचे फलित आहे. यामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील उद्योगांना दक्षिण कोरियातील ६५० हून अधिक प्रमुख उद्योगांशी संवाद व सहकार्य संबंध प्रस्थापित करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. कोल्हापूरच्या उद्योजकांना दक्षिण कोरियातील अद्ययावत संशोधन व विकास सुविधांचा लाभ घेण्याची संधी मिळेल, ही महत्त्वाची बाब आहे.''

सीआयआयचे दक्षिण महाराष्ट्र चेअरमन उद्योजक मोहन घाटगे यांचेही भाषण झाले. या वेळी चोन्नम विद्यापीठातील लिंक प्रकल्पाचे प्रा. योंग ह्युएन जेऊंग आणि पदार्थवैज्ञानिक प्रा. सँग-वॅन रियू उपस्थित होते. सामंजस्य करारावर प्रा. जेऊंग आणि प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या.

विद्यापीठ-उद्योग समन्वय कक्षाचे समन्वयक डॉ. एस. एस. कोळेकर यांनी प्रास्ताविक केले, तर प्रा. ए. व्ही. घुले यांनी आभार मानले. या प्रसंगी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, उद्योजक सचिन मेनन, रणजित शाह, सचिन शिरगावकर, सोहम शिरगावकर, योगेश कुलकर्णी, वैभव नाईक, यतीन जनवाडकर, प्रसाद गुळवणी, सुनील काळे, किरण पाटील, मनोज लक्ष्मेश्वर, गिरीश वझे यांच्यासह डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. के. साहू, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एस. बी. सादळे, डॉ. एम. एम. लेखक आणि डॉ. एन. जी. देशपांडे उपस्थित होते.

## नवसंशोधनास चालना मिळेल

» पान १ वरून

दोन्ही संस्थांदरम्यान संयुक्त संशोधन प्रकल्प, प्रयोगशाळा सुविधांचे आदानप्रदान, रोजगार संधी उपलब्ध होणेसाठी सहकार्य वृद्धिंगत करण्यास चालना देण्यात येणार आहे.

करारावर संचालक मंडळाचे चेअरमन किरण पाटील आणि प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत केले. समीर पारीख यांनी प्रास्ताविक केले, तर एस. एम. मांडरे यांनी आभार मानले.

दै. सकाळ शुक्रवार, दिनांक 11 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा धातू प्रबोधिनीसह दक्षिण कोरियाशी करार



## धातू प्रबोधिनीशी करारामुळे फौंड्रीशी संबंधित समस्या सुटणार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : दक्षिण कोरियातील योंग्स राष्ट्रीय विद्यापीठ आणि धातुतंत्र प्रबोधिनी, कोल्हापूर या दोन महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थांशी शिवाजी विद्यापीठाने आज सामंजस्य करार केले. यामुळे उद्योग जगताशी समस्या, संशोधनास मार्ग काढण्याबरोबरच आदान- प्रदानही शक्य होणार आहे.

दरम्यान, धातुतंत्र प्रबोधिनीशी झालेल्या करारामुळे फौंड्रीशी संबंधित समस्या सुटण्यास मदत होईल व पूरक संशोधनासही गती येईल, असा विश्वास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यापीठ-उद्योग समन्वय कक्ष आणि दक्षिण कोरियातील ग्यांग्नू येथील नामांकित योंग्स राष्ट्रीय विद्यापीठातील 'लिंक' (लीडर्स इन इंडस्ट्री-युनिव्हर्सिटी को-ऑपरेशन) या उपक्रमासाठी सामंजस्य पान ११ वर

### नवसंशोधनास चालना मिळेल

आज दुपारी येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये शिवाजी विद्यापीठ आणि धातुतंत्र प्रबोधिनी यांच्यात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारामुळे कोल्हापुरातील फौंड्री उद्योगाशी निगडित संशोधन आणि विकास कार्याबाबतच्या अनेक समस्या मार्गी लागतील; तसेच नवसंशोधनास चालना मिळण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला. या कराराअंतर्गत पान ११ वर

---

दै. सकाळ शुक्रवार, दिनांक 11 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षान्त सोहळा ही आयुष्याची खरी सुरवात

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : शासकीय तंत्रनिकेतनमध्ये पदविका प्रदान



---

जनसंपर्क कक्ष

दै. सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शुक्रवार, दिनांक 11 MAR 2016

# प्रा. डोळस यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर, ता. १० : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे प्रा. अविनाश डोळस यांचे व्याख्यान होणार आहे. शुक्रवारी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीत व्याख्यान होईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील. श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांच्या उपस्थितीत उद्घाटन होईल. संचालक डॉ. कृष्णा किरवले यांनी ही माहिती दिली. दरम्यान, डॉ. आंबेडकरांना परदेशात शिक्षणासाठी छत्रपती सयाजीराजे महाराज यांनी शिष्यवृत्ती दिली. या घटनेचे स्मरण म्हणून या दिवशी १२५ व्याख्याने होणार असल्याचेही त्यांनी कळविले आहे.

दै. तरुण भारत शुक्रवार दिनांक 11 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योजक होण्यासाठी कौशल्याची गरज

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे मत; शासकीय तंत्रनिकेतनचा २१ वा पदविका समारंभ उत्साहात



कोल्हापूर : विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत ए. बी. पर्वते-पाटील, किरण पाटील, प्राचार्य प्रशांत पट्टलवार आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

बदलत्या शिक्षण पद्धतीशी जुळवून घेण्यासाठी कौशल्याची गरज आहे. आगामी शैक्षणिक धोरणाला चालना देण्यासाठी भविष्यात मार्केट करण्याऐवजी कृती करा. विद्यार्थ्यांनी हातांचा पुरेपूर वापर करून आपल्यातील कौशल्य विकसित केली पाहिजे. प्रात्यक्षिकावरही उद्योजक होता येते. आत्मविश्वास कौशल्य आणि नियोजन असल्यास यश निश्चित मिळते. मेक इन इंडियात उद्योजक होण्यासाठी विकसित कौशल्याची गरज आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शासकीय तंत्रनिकेतनच्या २१ वा पदविका प्रदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावर्षी स्थापत्य अभियांत्रिकी १५१, यंत्र अभियांत्रिकी ११५, विद्युत अभियांत्रिकी ६७, औद्योगिक अणुविद्युत ६४, अणुविद्युत व दूरसंचार ११०, शर्करा उत्पादन तंत्र १२, माहिती तंत्रज्ञान ४९, धातू अभियांत्रिकी ३२, कम्युनिटी कॉलेजच्या १५१ असा ८३१ पदविका प्रदान केल्या.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, व्यावसायिक क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सातत्याने बऱ्याच नव्या गोष्टी शिकण्याची गरज आहे. व्यावसायिक मनसिकतेतून उद्योगाची उभारणी केल्यास तुम्ही त्यामध्ये यशस्वी व्हाल. बदलांना सामोरे जा, हा एकच मंत्र जागतिकीकरणाच्या आव्हानांना तोंड देण्याची सक्षमता प्रदान करेल.

प्राचार्य प्रशांत पट्टलवार यांनी अहवाल वाचन केले. अहवाल वाचनात शासकीय तंत्रनिकेतनची शैक्षणिक घोडदौड कायम असल्याचे स्पष्ट केले. शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना नोकरीची हमी मिळावी म्हणून कम्युनिटी कॉलेजची स्थापना केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मेक इन इंडियामध्ये कौशल्ये विकासाला प्राधान्य दिले पाहिजे, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

डॉ. ए. के. उपाध्याय, डॉ. के. पी. कुमार, प्रा. व्ही. के. करंगुर, डॉ. डी. एम. गर्गे, प्रा. आर. के. सावंत, प्रा. पी. पी. खेडकर, प्रा. के. ए. चव्हाण, प्रा. पी. बी. कांबळे, प्रा. एस. एम. मोंडे यांनी स्नातकांना पदविका प्रदान केल्या.

प्रा. आनंद राजमाने यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी ए. बी. पर्वते-पाटील, विक्रमसिंह शिंदे, शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डी. वाय. पाटील पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य महादेव नरके आदी उपस्थित होते.

---

तरुण भारत

# महाविद्यालयांमधे आज घुमणार महामानवाच्या जीवनपटाचा जयजयकार

## डॉ. आंबेडकर यांचे १२५ वे जन्मवर्ष व महाराजा सयाजीराव यांच्या जन्मदिनाच्या योगायोगनिमित्त जागर

विजय जाधव
गोडोली

दिल्लीच्या जेएनयू विद्यापीठात दिल्या गेलेल्या देशद्रोही कथित घोषणांनी सर्वत्र वैचारिक युध्दकुरु सुरू असताना शिवाजी विद्यापीठाच्या १२५ कॉलेजमध्ये शुक्रवारी घटनाकारांच्या जीवनचरित्राचे पोवाडे गायले जाणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा नव्या पिढीला समजणार नाहीत तोवर शक्तिशाली राष्ट्रनिर्मितीचा प्रयत्न असफल ठरेल. यंदा त्यांच्या जयंतीचे १२५ वे वर्ष राज्यभर साजरे केले जात असताना, महाराजा सयाजीराव यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून १२५ कॉलेजमध्ये जेष्ठ वक्ते घटनाकारांच्या जीवनाचा पट तरुणांपुढे उलगडणार आहेत.

बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण साताऱ्यात झाले. येथील प्रत्येक महाविद्यालय या जागरासाठी सज्ज झाले आहे.



डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रबोधनपर कार्यक्रम, परिसंवाद, व्याख्यान, चर्चासत्र अशा उपक्रमांच्या माध्यमातून हे वर्ष साजरे करण्याचा मनोदय कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी जानेवारीमध्येच व्यक्त केला होता. त्याप्रमाणे महाविद्यालयांना परिपत्रके पोहोच झाली असून सर्वच ठिकाणी जय्यत तयारी करण्यात आलेली आहे.

साताऱ्यात प्राथमिक शिक्षण घेता-घेता बाबासाहेबांना 'आंबेडकर' हे आडनाव मिळाले. त्यांच्या संपूर्ण जीवनाचा पट साऱ्यांनाच थक्क करणारा असून अनेक रोमांचकारी घटनांचा मिलाफ आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शिक्षण मदतीचे त्यांच्या जीवनात अमूल्य स्थान आहे. महाराजांनी दिलेल्या शिष्यवृत्तीमुळेच बाबासाहेबांना आपले उच्च शिक्षण पूर्ण करता आले. आंबेडकरांच्या १२५ व्या जयंती वर्षातील महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा जन्मदिन असा योग साधताना पुरोगामी विचारांची तरुणांच्या समवेत गुफ्तगू केली जाणार आहे. सर्व महाविद्यालयांनी सकाळी बरोबर ११ वाजता आपापल्या उपक्रमांना प्रारंभ करावा. यासाठी ज्येष्ठ व्याख्यात्यांची यादीही पाठवून महाविद्यालयांना पाठविण्यात आली आहे. उपक्रमांच्या योजनांमध्ये सारखेपणा येऊ नये म्हणून त्या त्या महाविद्यालयांना मोकळीकही देण्यात आली आहे.

महामानवाच्या जीवनपटाचा जयघोष करताना डॉ. बाबासाहेबांच्या विविध पैलूंवर परिसंवादाचे आयोजन केले असून आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांना यात सामावून घेण्यात येणार आहे.

या अभिनव उपक्रमांतर्गत सातारा जिल्ह्यातील वर्ये येथील कर्मवीर भाऊराव पाटील मॅनेजमेंट येथे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर ज्येष्ठ व्याख्याते प्रा. संभाजीराव पाटणे, पत्रकार अरुण जावळे, शिवाजी कॉलेज सातारा येथे ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. जे. एफ. पाटील (कोल्हापूर), यश. वी. साधना कॉलेज सातारा येथे श्रीमंत कोकाटे,

पान ६ वहा

---

# महाविद्यालयांमधे आज घुमणार महामानवाच्या जीवनपटाचा जयजयकार

पान १ वरुन

डी. जी. कॉलेज सातारा येथे ज्येष्ठ व्याख्याते हरी नरके, डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव येथे प्राचार्य अरुण गाडे आणि सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खंडाईत, दहिवडी कॉलेज येथे डॉ. एम. डी. शिंदे (सोलापूर), एस. जी. एम. कॉलेज–कराड येथे प्रा. विनय कांबळे (सांगोला), बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण येथे ॲड. संभाजीराव मोहिते आदी मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे.

या परिसंवादात घटनाकार, संसदपटू, शिक्षणतज्ज्ञ, नॅशनॅलिस्ट, अर्थतज्ज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, जलतज्ज्ञ, क्रांतीकारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा विविध विषयांवर परिसंवादात चर्चा होणार आहे.